परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/५५८ /२०२०
दिनांक- ०६/११ /२०२०

प्रति,
मुख्याध्यापक / प्र.मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय----------
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

विषय – सहा.शिक्षकांना सेवासातत्य दिलेबाबत......

महोदय,

माध्यमिक विभागातील सर्व सहा.शिक्षकांना कळविणेत येते कि काही शिक्षक पिंपरी चिंचवड महानगपरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात रूजु होण्यापुर्वी जिल्हा परिषद मान्यताप्राप्त विद्यालयामध्ये कार्यरत होते.शासन नियमानुसार त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात रूजु झाल्यानंतर सेवासातत्य देणेत आलेले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात रूजु झाल्यानंतर मागील सेवा केलेल्या संस्थेतील भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन,ग्रॅच्युटी व इतर रक्कमा मनपा कोषागरात जमा केल्याबाबत पावत्या सादर करणेबाबत संबधीत शिक्षकांना त्याबाबत सुचना देण्यात याव्यात.तसेच संबधीत (सहा.शिक्षक) नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत,ज्या शिक्षकांना सेवासातत्य देण्यात आलेले असेल त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरणास सदर पावत्या जोडण्यात याव्यात.जर त्यांनी पावत्या जमा केल्या नाहीत तर त्यांची सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागातील रूजु तारखेपासुनच धरणेत येईल.त्यांना सेवासातत्याचा लाभ मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.याबाबत सहा.शिक्षकांच्या नंतर येणा-या तक्रारीबाबत माध्यमिक शिक्षण विभाग जबाबदार राहणार नाही.

सदरचे परिपत्रक सर्व संबधीत सहा.शिक्षकांच्या निर्दशनास आणून देण्यात यावे,तसेच त्यांची स्वाक्षरी पोहोच मुख्यकार्यालयास पाठवणेत याव्यात.याबाबत पुन्हा स्मरण करून दिले जाणार नाही.याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे -१८